# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी—४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

( विद्या विभाग )

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली —४४२६०५ (विद्या) फोन नंबर ७१३२. २२३३२३


गोविग/विद्या/जा.क्र/४०७/२०२१ दि १८/१०/२०२१

## अधिसुचना

(शैक्षणिक सत्र २०२१—२२ करीता प्रवेशाची मुदतवाढ देण्याबाबत.)

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना व सर्व संबधितांना अधिसुचित करण्यात येते की, विद्यापीठाद्वारे निर्गमित अधिसुचना/जा.क्र./३८३/२०२१ दिनांक ३०/०९/२०२१ नुसार विद्यापीठाचे पदव्युत्तर शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयात सुरू असलेल्या विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याची अंतीम दिनांक १६/१०/२०२१ होती.

परंतू अनेक विद्यार्थी विहीत तारखेपर्यन्त महाविद्यालयात प्रवेश घेऊ शकले नाही व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी सर्व प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना मा. कुलगुरूंच्या परवानगीने दिनांक ३०/१०/२०२१ पर्यन्त महाविद्यालयात प्रवेश घेण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर मुदतवाढ ज्या अभ्यासक्रमाचे प्रवेश केंन्द्रीय प्रवेश समितीद्वारे केले जातात त्यांना लागू राहणार नाही. निर्धारित प्रवेश क्षमतेमध्ये रिक्त जागी प्रवेश देण्यासाठी हि मुदतवाढ देण्यात येत आहे, दिनांक ३०/१०/२०२१ नंतर कोणत्याही परिस्थीतीत मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये,

Swatmi

कुलसचिव (प्र)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादरः—**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र—कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. वित्त व लेखाधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) मा. विभाग प्रमुख सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
६) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित व संचालित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
७) विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
८) संगणक विभाग प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर अधिसुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करावी.

18.10.2021

स.कुलसचिव (प्र)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली